REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख ४ डिसेंबर १९४६ अंक ४७


## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस | |
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | „ १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | „ ६,७७,३७० |
| एकूण खेळतें भांडवल | „ ५८,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे
मॅ. डायरेक्टर

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

नांगर —यांचे— चरक

| नांगर | चरक |
|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | राजा ( एक बैली ) |

' मधुकर ' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

# विविध माहिती

**अरुंद तोंडांच्या छोट्या विहिरींना मदत**—प्रांतांतील पाणी-पुरवठा वाढविण्याच्या दृष्टीनें मुंबई सरकारनें अरुंद तोंडांच्या विहिरी खणणाऱ्यांना कांहीं अटीवर शेकडा ५० टक्के मदत देण्याचें ठरविलें आहे. अशा विहिरी सरकारच्या शेती एंजिनिअरच्या सल्ल्यानें खणण्यांत याव-याच्या आहेत.

**धातु-विषयक संशोधन केंद्र**—जमशेटपूर येथें खनिज-धातूंच्या संशोधनासाठी एक प्रयोगशाळा स्थापन करण्यांत येणार असून तिच्या इमारतीचा कोनशिला समारंभ श्री. राजगोपाला चारिअर्यांच्या हस्तें झाला. या प्रयोगशाळेला भांडवलाच्या स्वरूपाचा खर्च ४३ लाख येणार असून शिवाय दरवर्षीं ६ लाख रुपये खर्च येणार आहे.

**मद्रासमध्यें घर-बांधणीची योजना**—मद्रासचें कॉर्पोरेशन २८ कोटींच्या नवीन घरें बांधण्याच्या योजनेचा विचार करीत आहे. योजना नक्की झाली तर ती अंमलांत येण्यास १० वर्षें लागतील. या कालांत ३ लाख शहरवासीयांसाठी ५० हजार नवीं घरें बांधण्यांत येतील. या घरां-पैकीं ३० हजार घरें गरीब मध्यमवर्गासाठीं बांधण्यांत येणार असून त्यांची किंमत प्रत्येकी ४ हजार रुपये होईल. १० हजार घरें अधिक श्रीमंत मध्यम वर्गासाठी व उरलेलीं १० हजार सधन लोकांच्यासाठी बांधलीं जाणार आहेत.

**म्हैसूर संस्थानासाठी पक्के रस्ते**—खेड्यापाड्यांतील शेतीचा माल बाजारांत येण्याची सोय व्हावी या उद्देशानें म्हैसूरच्या सरकारनें कॉंक्रीटचे रस्ते बांधण्याची एक योजना आखली आहे. या योजनेस २ कोटी रुपये खर्च येणार आहे.

**इराकमधून धान्याची आयात**—इराककडून हिंदुस्थानला ६० हजार टन अन्नधान्य मिळेल अशी अपेक्षा हिंदुस्थान-सरकारच्या अन्न-खात्यातर्फे व्यक्त केली गेली आहे. मध्यपूर्वेंतील इतर देशांतूनही अन्नधान्य मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**अन्नधान्याची मोठ्या प्रमाणावर आयात**—नोव्हेंबर १४ रोजीं संपलेल्या आठवड्यांत हिंदुस्थानांत परदेशांतून १ लाख २२ हजार २०० टन धान्य आलें. त्यांत ६७ हजार ३०० टन गहू ( कणिक धरून ), २४ हजार ८०० टन बार्ली, १८ हजार २०० टन मका व ४ हजार टन तांदूळ असा तपशील आहे.

**२० लाख टन तांदुळाची तूट**—प्रांतिक व संस्थानच्या अन्न-अधिकाऱ्यांची परिषद नुकतीच दिल्ली येथें समाप्त झाली. यंदाच्या खरीपाच्या तांदुळाच्या पिकांत एकंदर २० लाख टन तूट येईल असा अंदाज परिषदेंत व्यक्त करण्यांत आला.

**इन्शुअरन्स कायद्यांत सुधारणा**—मध्यवर्ती कायदेमंडळाच्या सिलेक्ट कमिटीची बैठक नवी दिल्ली येथें ता. १६ डिसेंबर रोजीं भरणार असून त्यावेळीं विमा-कायद्यांत दुरुस्ती करणाऱ्या बिलाच्या मसुद्यावर विचार करण्यांत येणार आहे.

**अमेरिकन सोन्याची आयात**—अमेरिकेंतून हिंदुस्थानांत ४५० पौंड सोनें विमानानें आणण्यांत आलें असून तें कराचीला आल्याबरोबर मुंबईला पाठविण्यांत आलें. विमानानें सोनें आयात केल्याचा हा दुसरा प्रसंग आहे.

**दक्षिण-आफ्रिकेंत सामुदायिक कायदेभंग?**—संयुक्त राष्ट्र-संघटनेंत हिंदी लोकांना दक्षिण आफ्रिकेंत मिळणाऱ्या अन्याय्य वागणुकी-संबंधीं नुकताच वादविवाद झाला. त्याची फलनिष्पत्ति म्हणून दक्षिण आफ्रिकेच्या सरकारनें आपलें धोरण न बदलल्यास सामुदायिक कायदे-भंगाला प्रारंभ होणार आहे.

**शेतकऱ्यांसाठी कर्जाची सोय**—मध्यवर्ती सरकारच्या शेतकी-आर्थिक कमिटीनें केलेल्या अहवालाला अनुसरून शेतकऱ्यांना पतीवर कर्जे देण्याची सोय करण्याचा विचार करण्यासाठी एक परिषद ता. १४ डिसेंबर रोजीं मुंबई येथें भरणार आहे. डॉ. डी. आर. गाडगीळ या कमि-टीचे अध्यक्ष असून ती प्रांतिक सहकारी बँकेतर्फे भरविण्यांत येत आहे.

**सर राधाकृष्णन् यांना नवा मान**—संयुक्त राष्ट्रसंघाच्या शैक्षणिक-सांस्कृतिक व शास्त्रीय संघटनेच्या अध्यक्षपदावर सुप्रसिद्ध हिंदी तत्त्वज्ञ प्रो. राधाकृष्णन् यांची निवडणूक झाली आहे. या संघट-नेच्या हिंदी प्रतिनिधि-मंडळाचे ते पुढारी होते.

**फ्रान्समधील निवडणुकांचा रागरंग**—फ्रान्सच्या नव्या घटने-प्रमाणें निवडावयाच्या वरिष्ठ सभागृहाची निवडणूक करण्यासाठी प्राथमिक मतदारांच्या निवडणुका नुकत्याच झाल्या. या निवडणुकांत प्रागतिक कॅथोलिक आणि कम्युनिस्ट यांच्यांत खरी चुरस आहे. प्राथमिक निवडणुकींत कम्युनिस्ट पक्षातर्फे २४०८८ मतदार आणि कॅथोलि-कांच्या तर्फे २४७५५ मतदार निवडून आले.

**अमेरिकेंत अणुसंशोधनाकरतां नवीन प्रयोगशाळा**—न्यूयॉर्कजवळ अणुसंशोधनाकरतां, नॉल्स ॲटॉमिक पॉवर लॅबोरेटरी नांवाची प्रयोगशाळा उभारण्यांत येणार आहे. तिचा उभारणीखर्च दोन कोटि डॉलर्स होईल. ह्या प्रयोगशाळेंत अणुशक्ति उत्पादन करण्याचे प्रयोग केले जातील.

**टेलिव्हिजन यंत्रांचा प्रसार**—अमेरिकेंत पुढील दहा वर्षांत अडीच कोटि टेलिव्हिजन यंत्रें विकलीं जाऊं शकतील असें रेडियो मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या एका डायरेक्टरचें मत आहे. एक वर्षाच्या आंत टेलिव्हिजनचा धंदा सत्यसृष्टींत उतरून ह्या धंद्यांत २५ लक्ष लोकांना काम मिळेल असें त्यांचें म्हणणें आहे. टेलिव्हिजन यंत्राची किंमत अंदाजें २५० पासून ४०० डॉलर्स होईल.

**सहा अमेरिकनांना नोबल प्राइझ**—नोबल प्राइझच्या इति-हासांत प्रथमच पाचांपैकी चार बक्षिसें एकाच राष्ट्राच्या नागरिकांना मिळालीं आहेत. त्याचप्रमाणें एकाच देशाच्या सात नागरिकांना त्याच वर्षांत नोबल प्राइझ मिळाल्याचाही हा पहिलाच प्रसंग आहे. शांततासंबंधीं नोबल प्राइझ दोघां अमेरिकनांत विभागलें आहे. तसेंच रसायन विषया-संबंधीं प्राइझ देखील दोघा अमेरिकनांत वाटून दिलें आहे. विज्ञानशास्त्राचें प्राइझ एका अमेरिकनास व वैद्यकशास्त्र आणि शारीरशास्त्र ह्यासंबंधीं नोबल प्राइझ दुसऱ्या एका अमेरिकनास मिळालें आहे. वाङ्मयासंबंधीं नोबल प्राइझ जर्मनींत जन्मलेल्या परंतु स्वित्सर्लंडमध्यें स्थायिक झालेल्या एका नागरिकास मिळालें आहे.


बडोदें सरकारच्या आश्रयानें संस्थापित

**दि बडोदा बॅटरीज् लिमिटेड.**

गोया गेट, बडोदा

★ ऑर्डिनरी शेअर्स रु. २० चे प्रत्येकीं पेडअप रु. १०. क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स, ५½ टक्के व्याजाचे, प्रत्येकीं रु. ५० चे पेडअप रु. २५.

★ १,२,३ व ४ वर्षे मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येत आहेत.

★ सुप्रसिद्ध "तेज" बॅटरीज तयार करणारा राष्ट्रीय उद्योगधंदा.

मॅनेजिंग एजंटस :

**पानसे आणि कंपनी,**

गोया गेट, बडोदा.

किंवा, सरदार पानसेवाडा, शुक्रवार पेठ, पुणें.

या पैकीं कोणत्याहि ठिकाणीं माहिती पत्रकें व अर्जाचे फॉर्म्स इत्यादि मिळतील.

# अर्थ

बुधवार, ता. ४ डिसेंबर १९४६





प्रो. वा. मो. काळे


संपादक :

श्रीपाद् वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ४ रु. किरकोळ अं. २ आणे.


## सहकारी शिक्षण योजना

मुंबई सरकारच्या काँग्रेस मंत्रिमंडळानें एप्रिल १९४६ मध्यें मुंबई प्रांतिक सहकारी संस्थेचे अध्यक्ष सर जनार्दनराव मदन यांचे अध्यक्षतेखालीं एक समिति नेमून सध्याची सहकारी शिक्षणाची व्यवस्था याचें निरीक्षण करून सहकारी खातें व सहकारी संस्था यांचे नोकर वर्गाचेबाबत त्या शिक्षणाची वाढ कशी करावी व तें शिक्षणाचें कार्य कोणत्या संस्थेमार्फत करावें यासंबंधींच्या सूचना समितीस करावयास सांगितल्या होत्या. समितीनें इलाख्यांतील ९ सहकारी संस्था, ८ सरकारी अधिकारी व २२ निमसरकारी सहकारी कार्यकर्ते यांच्या तोंडी व लेखी साक्षी घेऊन आपला अहवाल तयार केला आहे.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या प्रगतीचे चार कालखंड कल्पिल्यास पहिला खंड सन १९०४–१९१९ असा समजतां येईल. या कालाचे अखेरीस २०८३ सहकारी सोसायट्या होत्या व त्यांचें खेळतें भांडवल सुमारें २ कोट रुपये होतें व सभासद्संख्या सुमारें २ लाख होती. दुसरा खंड १९३० पर्यंतचा समजतां येईल. या कालाचे अखेरीस एकूण सोसायट्या ५७३४, खेळतें भांडवल सुमारें १३ कोटपर्यंत व सभासद्संख्या पावणे सहा लाखपर्यंत होती. या कालांत सहकारी संस्थांचा बऱ्याच नवीन अशा कार्यक्षेत्रांत प्रवेश झाला. तिसरा कालखंड १९३८ पर्यंतचा. या कालांत जागतिक आर्थिक मंदीचा परिणाम सहकारी चळवळीस जाणवला. या काळांत सोसायट्यांची संख्या ५०९३ होती, सभासद संख्या सहा लाखांचेवर होती व खेळतें भांडवल १५॥ कोटी रुपयांचेवर होतें. शेवटचा कालखंड सन १९३९–४५ पर्यंतचा होय. या कालांत युद्धपरिस्थितीनें सहकारी चळवळीस चालना मिळून मुख्यत्वेंकरून ग्राहक सहकारी संस्थांना चांगली चालना मिळाली. सन १९४४–४५ सालांत एकूण ६६५३ सहकारी संस्था असून सभासद-संख्या १२ लाखांचे आसपास होती व खेळतें भांडवल २५॥ कोटी रुपयांचे वर होतें. सहकारी चळवळीचा मुंबई इलाख्यांत प्रचार सुरू झाल्यापासून सरकारी अधिकारी व सहकारी कार्यकर्ते यांना सहकारी शिक्षण मिळणें अवश्य असल्याचें मान्य करण्यांत आलें, परंतु त्या बाबतची योजना अपुरी होती. प्रथम मुंबई प्रांतिक इन्स्टिट्यूटनें मुंबईस व इतरत्र जिल्ह्यांत सेक्रेटरीसाठी क्लासेस चालविले व नंतर बँक इन्स्पेक्टर्स, सुपरवायझर्स, मॅनेजर्स यांचेसाठीही क्लासेस चालविण्यांत आले. पुढें पुणें, धारवाड व सुरत येथें सहकारी शिक्षणाच्या शाळा काढल्या. सहकारी खात्यानें आपल्या अंमलदारासाठी शिक्षण देण्याची व्यवस्था चालू ठेवली.

समितीनें फार महत्त्वाची अशी शिफारस करून यापुढें सहकारी शिक्षणाचे बाबत एक विचारपूर्वक योजना तयार करून शिक्षणाची व्यवस्था मुंबई प्रांतिक इन्स्टिटयूटकडे सोंपवावी असें सुचविलें आहे. यापुढें सरकारी सहकारी खात्याचे नोकर, निमसरकारी सहकारी कार्यकर्त्यांसाठी जेथें शिक्षण दिलें जाणार आहे तेथेंच त्यांनाही शिक्षण मिळणार आहे. समितीनें शिफारस करून शिक्षणासाठी खालील व्यवस्था सुचविली आहे.

(१) प्रत्येक जिल्ह्यांतील शेतकी सहकारी पतपेढ्या व तशाच लहान सहकारी संस्था यांचे नोकरवर्ग व सभासद यांचेसाठी वर्ग चालविणें.

(२) चार प्रादेशिक शिक्षणाच्या शाळा पुढील ठिकाणीं असाव्यात (१) पुणें (२) मुंबई (३) धारवाड व (४) गुजराथमध्यें एक. शाळांमधून सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर्स, असि. डिस्ट्रिक्ट को-ऑफिसर्स व तालुका खरेदी विक्री संघाचे मॅनेजर्स यांना या ठिकाणीं शिक्षण द्यावें.

(३) पुणें येथें एक सहकारी शिक्षण कॉलेज काढावें व यामध्यें खात्यांमधील वरिष्ठदर्जाचा नोकरवर्ग व सहकारी संस्थांमधील महत्त्वाच्या जागीं काम करणारे अधिकारी यांना शिक्षण द्यावें.

वरील शिक्षणाखेरीज सहकारी चळवळीचा प्रचार होण्याचे दृष्टीनें शाळांमध्यें चालू असणाऱ्या क्रमिक पुस्तकांमधून सहकारी चळवळी-संबंधींचे धडे समाविष्ट करावेत. नभोवाणीवरून (खेडेगांवाचे कार्यक्रमांचे व्यवस्थेमधून) व्याख्यानें, मॅजिकलॅटर्नचे साह्यानें व्याख्यानें, परिषदा भरवून प्रादेशिक शाळांस जोडून वाचनालयें व पुस्तकालयें चालवून लहान लहान पुस्तकें व पत्रकें प्रसिद्ध करून. व इंग्रजी आणि इलाख्यांतील प्रमुख भाषांमधून नियतकालिकें चालवून व्यवस्था करावी.

या सर्व कार्यांसाठी लागणाऱ्या पैशाची व्यवस्था पुढीलप्रमाणें करावी असें समितीनें सुचविलें आहे. इलाख्यांतील ज्या सहकारी संस्था शेकडा ४ टक्के अगर त्यापेक्षा ज्यास्त फायदा जाहीर करतील त्यांनीं आपल्या निव्वळ फायद्यापैकीं १ ते २ टक्के दर साल रक्कम मुंबई प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या शिक्षणफंडास द्यावी व बाकीची रक्कम सरकारनें मदत म्हणून द्यावी. शिक्षणाच्या व्यवस्थेसाठी प्रत्येक जिल्ह्यास एक शिक्षण सुपरवायझर नेमला जाईल व त्याजकडे जिल्ह्यांतील शिक्षणाची व्यवस्था सोंपविली जाईल. या सर्व व्यवस्थेस एकुण खर्च रु. ६४,५६० येईल. प्रादेशिक शाळांसाठी सुपरिंटेंडेंट राहील व यासाठी एकूण खर्च रु. ३३,५०० येईल. कॉलेजसाठी मुख्याध्यापक, प्रोफेसर्स वगैरेसाठी रु. ३६,१८० खर्चाचा अंदाज धरण्यांत आला आहे. मुंबई प्रांतिक इन्स्टिट्यूटनें एक एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर नेमून इलाख्यांतील सर्व सहकारी शिक्षणाची व्यवस्था त्यांजकडे सोंपवावयाची आहे व त्यासाठी वार्षिक खर्च रु. ७४४०।– येईल. या सर्व योजनेचा वार्षिक चालू खर्च रु. १,४१,६८० येईल असा अंदाज धरण्यांत आला आहे.

इलाख्यांतील सहकारी चळवळीचा प्रचार लक्षांत घेतां व युद्धोत्तर योजनेंत सहकारी चळवळीवरील येणारी जबाबदारी लक्षांत घेतां चळवळीच्या दैनंदिन कारभारांत लक्ष घालणारे कायम नोकर, कार्यकर्ते यांना शिक्षण देऊन कार्यक्षम करणें, त्याचप्रमाणें जनतेमध्यें सहकारी चळवळीचा प्रचार योग्य तऱ्हेनें होणें अवश्य असल्यानें समितीनें सुचवलेली योजना स्वागतार्ह आहे असें म्हणणें योग्यच ठरेल.

---

**दोन नवे शास्त्रीय शोध**—रशिअन पदार्थ विज्ञान शास्त्रज्ञांनीं अणूंचें भजन करण्याची एक नवी रीत शोधून काढली आहे. संशोधनाचें नांव प्रो. लुकीर्स्की असें आहे. प्रो. यॅनोव्हस्की यांनीं विजेच्या साहाय्यानें भूम्यंन्तर्गत खनिज पदार्थांचा शोध करण्यांत यश मिळविलें आहे.

**खादी विरुद्ध गिरणीचें कापड**—मद्रास प्रांतांतील कापड–गिरणी मालकांची एक सभा भरून तींत मध्यवर्ती सरकारनें प्रांताला दिलेल्या वाट्या व माग परत करण्यासंबंधींचा मद्रास सरकारचा निर्णय बेकायदा आहे, असा ठराव करण्यांत आला.

**शेतीविषयक सरकारी मासिक**—मुंबई प्रांतांतील शेती–सुधारणेला मार्गदर्शन करण्यासाठी मुंबई सरकार एक शेतकी–विषयक मासिक पुढील वर्षांपासून काढणार आहे. हिंदुस्थानच्या इतर प्रांतांतील व परदेशांतील शेतीविषयक पद्धतींची माहिती या मासिकांत देण्यांत येणार आहे.

**शेक्सपिअरच्या नाटकांची किंमत**—अमेरिकेंतील एका जुन्या वस्तूंची आवड असणाऱ्या गृहस्थानें शेक्सपिअरच्या नाटकांच्या ४ जुन्या प्रति जवळ जवळ १ लाख रुपयांना विकत घेतल्या.

## औद्योगिक क्षेत्रांत सहकाराचें तत्त्व

("Industrial Co-operation—Its Possibilities within a Balanced Movement")

ले.— जे. बी. टेलर. प्रकाशक : इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह ऑर्गनायझिंग कमिटी. पृ. सं. ४४ [किंमत १ रु.]

या पुस्तिकेचे लेखक प्रो. टेलर हे चीनमधलि येचांग विश्वविद्यालयांतील प्राध्यापक आहेत. सहकारी चळवळ व ग्रामीण प्रश्न यासंबंधींचा त्यांनीं प्रदीर्घ व्यासंग केलेला आहे. चीनमधलि आर्थिक प्रश्नांसंबंधीचे त्यांचे लिखाण अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांस विश्रुत आहे. प्रो. टेलर हे नुसते पांडित विद्वान नसून चीनमध्यें औद्योगिक क्षेत्रांत सहकारी तत्त्वावर पुनर्घटना करण्याचे जे पुष्कळसे यशस्वी प्रयत्न झाले व होत आहेत, त्यांत त्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतलेला आहे.

प्रस्तुत पुस्तिकेंत औद्योगिक क्षेत्रांत सहकारी तत्त्वाचा अंगिकार व फैलाव करण्यासंबंधींचे त्यांचे विचार त्यांनीं ग्रथित केले आहेत. निरनिराळ्या देशांतलि सहकारी चळवळींचा अनुभव जमेस धरून व त्याचे दाखले देऊन औद्योगिक क्षेत्रांतील निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांची त्यांनीं चर्चा केली आहे व त्या प्रत्येकासंबंधींचें आपलें मत व विचार सुसंबद्ध व आटोपशीर रीतीनें मांडले आहेत. ग्राहकांचे व उत्पादकांचे सहकारी संघ स्थापन करण्याची आवश्यकता व दोहोंमधलि सहकार्य हें किती महत्त्वाचें आहे हें प्रो. टेलर यांनीं फार समर्पक रीतीनें दाखविलें आहे. औद्योगिक क्षेत्रांत सहकाराचें तत्त्व मोठ्या प्रमाणावर अंगिकारलें गेलें तर सध्याच्या यंत्रयुगांत प्रतिदिनीं होणारी मानवी मूल्यांची परिच्छेहाट व अधोगति थांबवितां येईल व सामान्य श्रमजीवी जनतेचे जीवन अधिक सुखी व परिपूर्ण करतां येईल असा विश्वास त्यांनीं प्रकट केला आहे.

अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांस व सहकारी चळवळींतील मंडळींस ही पुस्तिका फार उपयोगी पडेल. श्री. वैकुंठभाई मेहता यांनीं या पुस्तकास पुरस्कार लिहिलेला आहे.

गोखले इन्स्टिट्यूट, पुणें ४ नी. वि. सोवनी.

## गुळाचें अपुरें उत्पादन


उसाच्या लागवडीखालील जमिनीचें क्षेत्र कमी झाल्याकारणानें १९४५–४६सालच्या हंगामांत गुळाचें उत्पादन कमी झालें व त्याचा साहजिक परिणाम भाव कडाडण्यांत झाला. गूळ जादा प्रमाणांत तयार करणारे हिंदुस्थानांतील विभाग म्हणजे संयुक्त प्रांत, वायव्य सरहद्द प्रांत, मद्रास व कोल्हापूर या सर्व विभागांतून अहवालाचे वर्षी अंदाजापेक्षां पुष्कळच कमी गूळ बाहेर प्रांतांत रवाना होऊं शकला. संयुक्त प्रांतांतून सुमारें ३ लक्ष टन गूळ बाहेर रवाना व्हावा असा अंदाज होता. पिकाची एकाकाळची परिस्थिति पाहून जादा गुळाचें हें प्रमाण ३ लक्ष टनावरून फक्त २लक्ष टनावर येतें कीं काय अशी भीति उत्पन्न झाली होती. परंतु पुढें सुदैवानें सुमारे २ लक्ष ५८ हजार टन गूळ या प्रांतांतून अन्य प्रांतांकडे रवाना करतां आला. वायव्य सरहद्द प्रांतांतून ७२ हजार टन गूळ बाहेर प्रांतीं रवाना करतां येईल असा अंदाज होता. परंतु उत्पादनांत घट झाल्याकारणानें फक्त ५६ हजार टन गूळ बाहेर प्रांतांत पाठविण्यास परवाने देण्यांत आले. मद्रास इलाख्यांतून ५० हजार टन गूळ बाहेर पाठविता येईल असा अंदाज होता. परंतु अन्नधान्याच्या टंचाईमुळें स्थानिक मागणी वाढून फक्त २६ हजार ६ शें टन गूळ बाहेर रवाना करता आला

## दि विजय टेक्स्टाइल्स लि. पुणें

(वार्षिक सभा: १–१२–४६)

३१ मार्च १९४६ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीनें २ लक्ष,४७ हजार रुपयांची विक्री करून ३६ हजार रुपये ठोक व ११,४२६ रु निवळ नफा मिळविला. त्यांत सूत वाटण्याच्या कमिशनच्या १,६१५ रुपयांचाहि समावेश होतो. भागीदारांस ६% डिव्हिडंड वाटण्यांत येणार आहे. ६,९६८ रुपयांचा विनियोग पूर्वीच्या तोट्यापैकीं बराच भाग लिहून टाकण्याकडे केला जाईल


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

व्याज-वजा
बेलापूर रु. ९ डि. १५-१-४७

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडिन S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २६।११।४६ | बुधवार २७।११।४६ | गुरुवार २८।११।४६ | शुक्रवार २९।११।४६ | सोमवार २।१२।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६७५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २८२०-० | २८०७-८ | २८२२-८ | २८२५-० | २८३०-० |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५०९-८ | ५०८-० | ५११-० | ५१०-८ | ५१०-९ |
| २२२२-८; १७६३-१२ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | २७२५ | २७२५ | २७०५ | २६७० | २६५० |
| ७०२; ५६६ | १२-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ९०७ | ९०७ | ९१० | ९०९ | ९१० |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ७१७ | ७१०-० | ७२३ | ७२८ | ७२१-० |
| ४४३-८; ३६० | ७-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ४११-० | ४११-० | ४१२-८ | ४१३-० | ४१२ |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३९६ | ३९५-० | ३९७ | ३९७ | ४०० |
| ३३५; २८३-८ | ६-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३७२ | ३७२ | ३७९ | ३७६ | ३७६ |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४२१ | ४२१ | ४२९ | ४२९ | ४३२ |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५-१ | ५-१-६ | ५-१ | ५-२-६ | ५-३-० |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २७-० | २०-० | २०-१ | २०-२-६ | २०-३-० |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ४-६-६ | ४-६-६ | ४-७ | ४-८ | ४-७ |
| ७९०; ६४५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७४८-१२ | ७५८-१२ | ७६२-८ | ७६२-८ | ७६६-४ |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३४ | २३३ | २३४-८ | २३४-० | २३४-८ |
| २५६; २१३-८ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३५६ | ३५० | ३५२ | ३५४ | ३५६-० |
| ५९२-८; ५१०-८ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६५५ | ६५७-८ | ६७२-८ | ६७५ | ६७२-८ |
| ४३-७; ३०-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४७-० | ४६-१२ | ४६-१३ | ४६-१० | ४६-१३ |

आंध्र खादीचे
(म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे)
—एकमेव विक्रेते—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें

**कालव्याचें पाणी वापरणाऱ्या मळेकऱ्यांकरतां नियम**—फॅक्टरी इरियांत कालव्याचें पाणी वापरणाऱ्या मळेकऱ्यांनीं पुढील तीन वर्षांच्या आंत आपआपल्या गांवांतून उसाचें पीक केंद्रीभूत करावें असें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. कालव्याचें पाणी वाया जाऊं नये हा ह्या योजनेचा हेतु आहे. ह्या अवधींत मळेकऱ्यांनीं आपला ऊस सरकार-नियुक्त किंमतीस कारखानदारांना विकावा ही संयुक्तप्रांत व बिहार ह्यांची योजना मुंबई सरकारनें अंगीकारली आहे. सरकारनियुक्त किंमतीस ऊस विकण्यास जे मळेकरी तयार होणार नाहींत त्यांना कालव्याचें पाणी वापरण्याचे परवाने मिळणार नाहींत. जे मळेकरी ह्या योजनेस लेखी संमति देतील त्यांच्याबाबत पाणीपरवानाविषयक हुकुमाची अंमलबजावणी एक वर्षपर्यंत स्थगित केली जाईल. ह्या वर्षांत मळेकऱ्यांनीं केंद्रीभूत जमिनी करण्याचा प्रयत्न केला आहे असें सरकारच्या दृष्टोत्पत्तीस आलें पाहिजे, आणि तीन वर्षांच्या आंत मात्र सरकारनें पसंत केलेल्या जमिनींत आपले मळे सुरू केले पाहिजेत. फलटण शुगर वर्क्स लिमिटेडच्या फॅक्टरी एरियांतील जमीन मालकांस हा हुकूम लागू नाहीं.

**हुंडा-प्रतिबंधक बिल**—लग्नांत हुंडा देण्यास किंवा घेण्यास प्रतिबंध करणारें एक बिल मुंबई विधिमंडळांत एका सभासदानें मांडलें आहे. हुंड्याच्या चालीमुळें वधूपित्यांना मुलींचीं लग्नें जमवितांना जबर रकमा खर्च कराव्या लागतात, कांहीं ठिकाणीं तर मुलींची खरेदी-विक्री राजरोस चालू आहे. ह्या अनिष्ट रूढीस पायबंद घालण्याकरतां हें बिल आवश्यक आहे, असा कायद्याचा उद्देश सांगितलेला आहे. हा कायदा तूर्त अहमदाबाद, भडोच, खेडा, पंचमहाल व सुरत ह्या जिल्ह्यांस लागू करावा अशी बिलांत योजना आहे. वधूचा बाप, आई किंवा पालक यांनीं वराचा बाप, आई किंवा पालक यांना द्रव्यरूपानें किंवा वस्तुरूपानें दिलेल्या भेटीचा समावेश हुंड्यांत होतो. मात्र स्त्रीधनाचा समावेश हुंड्यांत होत नाहीं. हुंडा घेणारास तीन महिन्यांपर्यंत साधी कैद किंवा दंड व हुंडा देणारास एक महिना साधी कैद किंवा दंड अशा शिक्षा होतील.

**रुमेनिअन निवडणुकी अमेरिकेला अमान्य**—रुमेनिआंत झालेल्या निवडणुकीचे निकाल अमेरिकेनें अमान्य केले आहेत. मतदारांच्या याद्या तयार करण्यांत धाकदपटशा आणि इतर अन्याय्य मार्गांचा उपयोग करण्यांत आला असें अमेरिकेचें म्हणणें आहे.



# वि ज य
# टेक्स्टाइल्स लि.


—येरंडवणा पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

**मॅनेजिंग एजंट्स्.**

---



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

---

## तोच सुदिन
कीं
ज्या दिवशीं भारतावर
स्वातंत्र्यसूर्य चमकेल

पण हा सुदिन आपण स्वयंसिद्ध झाल्याविना कसा दिसेल।

याकरतां देशांतील सर्व उद्योगधंदे पूर्ण राष्ट्रीय करून परदेशांत जाणारा द्रव्यौघ थांबविणें, हें आपलें आद्य कर्तव्य ठरतें. तरी आयुष्याच्या विम्याचा धंदा करणारी

येथील सुप्रसिद्ध

# कॉमनवेल्थ
## विमा कंपनी लि.,

येथें आपला स्वतःचा विमा उतरून आपल्या कर्तव्यांतून मुक्त व्हा.

एजन्सीसाठी आजच लिहा अगर भेटा

ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर—अध्यक्ष

ब एस. एम. जोशी—मॅनेजिंग डायरेक्टर

---

## सांडू
## प्रेगयुटेरी

गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक

सांडू ब्रदर्स चेंबूर लिमीटेड (चेंबूर मुं.)

चीफ एजंटः—

न्यू दत्त एजन्सी

१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.

---

## डोंगरे
याच्या
## बालामृताने
अशक्त मुले सशक्त होतात

---

## पंढरीनाथ
ब्रिलिअन्टाईन वापरा

---







हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि घर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.